# जिल्ह्यात अतिवृष्टीने नुकसान; ओला दुष्काळ जाहीर करा

## लातूर शहर जिल्हा काँग्रेसची निवेदनाद्वारे मागणी, आंदोलनाचा इशारा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, यासाठी ओला दुष्काळ जाहीर करावा, तसेच शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, या प्रमुख मागण्यांसाठी आज लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी आणि लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. यावेळी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना भेटून शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत सविस्तर माहिती दिली आणि तातडीने मदत जाहीर करण्याची मागणी केली.

काँग्रेसच्या प्रमुख मागण्या: नदी-नाल्यांजवळील शेतजमिनींचे नुकसान: नदी आणि नाल्यांच्या काठावरील जमिनींचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने हेक्टरी २ लाख रुपये मदत द्यावी. घरांचे नुकसान: पावसामुळे पाणी घुसून पडलेल्या घरांच्या कुटुंबांना तात्काळ घरकुल योजना मंजूर करावी. तसेच, पडझड झालेल्या घरांच्या दुरुस्तीसाठी त्वरित निधी मंजूर करावा. पाळीव जनावरांचे नुकसान: पाळीव जनावरे गमावलेल्या कुटुंबांना प्रत्येकी १ लाख रुपये मदत द्यावी. रस्त्यांची दुरुस्ती: पावसाळ्यात खराब झालेले आणि उखडलेले गावांतर्गत व गावाकडे जाणारे सर्व रस्ते तातडीने दुरुस्त करावेत. शेती नुकसान भरपाई: कोरडवाहू जमिनीतील नुकसानीसाठी एकरी ५० हजार रुपये, बागायती जमिनीतील नुकसानीसाठी एकरी १ लाख रुपये आणि फळबागांमधील नुकसानीसाठी एकरी १.५ लाख रुपये मदत जाहीर करावी. कर्जमाफी: शेतकऱ्यांचे सर्व शेती कर्ज, तसेच वीज बिल, ट्रॅक्टर, बैलगाडी आणि शेती अवजारांवरील कर्ज तातडीने माफ करावे. काँग्रेस पक्षाने स्पष्ट केले की, जर सरकारने शेतकऱ्यांच्या या मागण्यांकडे दुर्लक्ष केले, तर काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन करतील. याबाबत काँग्रेसने सरकारला कठोर पावले उचलण्याचा इशारा दिला आहे. लातूर जिल्ह्यात यंदा अतिवृष्टीमुळे नद्या आणि



नाल्यांना पूर आल्याने शेतजमिनी पाण्याखाली गेल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे खरीप हंगामातील पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. तसेच, अनेक गावांमध्ये रस्ते खराब झाले असून, घरांची पडझड झाली आहे. काँग्रेसने प्रशासनाकडे तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आणि नागरिकांना आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या या संकटाला तोंड देण्यासाठी सरकार काय पावले उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. काँग्रेस पक्षाने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# तुम्ही डीजे वाजवा आम्ही कार्यवाही करू

## निलंग्यात डीजे मुक्त गणेश विसर्जन साजरा करण्याचे पोलीस निरीक्षक सुधीर सूर्यवंशी यांचे आवाहन

**निलंगा/प्रतिनिधी :** कायदा सुव्यवस्था टिकवण्यासाठी गणेश उत्सव व ईद ए मिलाद पैगंबर जयंती मिरवणूकिसह सर्वच सण ऊत्सव डीजे मुक्त होणार आहे. त्या अनुषंगाने निलंगा पोलीस ठाणे येथे डीजे धारकांची बैठक घेण्यात आली. यात सर्व डीजे धारकांना नोटीस देण्यात आले. जर यानंतर डीजे वाजला तर डीजे जप्त करून कडक कारवाई केली जाईल असा इशारा

निलंगा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधीर सूर्यवंशी आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत बांगर यांनी डीजे धारकांना दिला असून आगामी सर्व उत्सव सामाजिक सलोखा ठेवून साजरे करावे असे आवाहनही करण्यात आले.

आगामी सर्व येणाऱ्या सण उत्सव सामाजिक कार्य हे डीजे मुक्त साजरा करावा यासह महाराष्ट्र शासनाने



दिलेल्या सूचनांचे व आदेशाचे पालन करावा तसेच लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे आदेशानुसार निलंगा येथील उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल ढूमे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुधीर सूर्यवंशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत बांगर यांनी निलंगा पोलीस ठाणे येथे सर्व डीजे धारकांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

यात आगामी येणारा गणेशोत्सव व पैगंबर जयंती (ईद ए मिलाद) उत्सवासह येणारे सर्व सण,सामाजिक कार्य हे डीजे मुक्त साजरा करावा.

गणेश उत्सव व पैगंबर जयंती हे दोन्ही सण आपल्या सर्वांच्या अस्मितेचे आहे. यासाठी निलंगा पोलीस ठाणे हद्दीत कायदा सुव्यवस्था टिकवण्यासाठी पोलिसांबरोबर गणेश मंडळ, मुस्लिम समाजाचे कार्यकर्ते यांनी सहकार्य करणे गरजेचे आहे. यामुळे गणेशोत्सव पैगंबर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करणार असून यासाठी सर्वांनीच कायदा सुव्यवस्था व सामाजिक बांधिलकी राखावी असे आवाहनही यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत बांगर यांनी केले आहे. जर यानंतर कुठल्याही सण उत्सव व सामाजिक कार्यामध्ये डीजे वाजला तर डीजे जप्त करून संबंधित डीजे धारकांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे सर्व डीजे धारकांना नोटीसा देऊन सांगितले आहेत. यावेळी गोपनीय शाखेचे प्रमुख दादा शिंदे, मदतनीस प्रकाश चव्हाण यांच्यासह अनेक पोलीस कर्मचारी व डीजे धारक उपस्थित होते.


## देवणी नगर पंचायत कार्यालय, जि.लातूर

दूरध्वनी क्र. ०२३८५-२६९०००   ई-मेल :- npdeoni@gmail.com

जा.क्र. २०२५/नंपदे/ ७१६/२०२५   दि.०४/०९/२०२५

### जाहीर सुचना

देवणी नगर पंचायत हद्दीमधील सर्व नागरिकांना या द्वारे सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंर्तगत नगर पंचायत देवणी मार्फत देण्यात येणाऱ्या ६४ सेवांच्या यादीची अधिसुचना हि महाराष्ट्र शासन राजपत्र मध्ये प्रकाशित केली आहे. सदरील अधिसुचना नगर पंचायत देवणी च्या संकेतस्थळावर (https://mahaulb.in) नगर पंचायत कार्यालयात नागरिकांच्या माहितीसाठी डकविण्यात आली आहे याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी,
नगर पंचायत देवणी


# सरपंचाचे प्राण वाचवणाऱ्या डॉक्टरचा सत्कार

## निलंग्यातील डॉ. अहंकारी यांनी केले होते कसोशीने प्रयत्न

**निलंगा/प्रतिनिधी :** शेडोळचे तरुण सरपंच स्वरूप धुमाळ यांना हृदयविकाराच्या झटक्यानंतर त्यांचे बंद पडलेले हृदय डॉ. श्रीधर अहंकारी यांनी सीपीआर देऊन स्वरूप धुमाळ यांना जिवदान दान देण्याचे काम केल्याबद्दल शेडोळ ग्रामस्थांनी त्यांची कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या संपूर्ण टिमचा सत्कार केला.

निलंगा तालुक्यातील शेडोळ गावचे लोकप्रिय सरपंच स्वरूप धुमाळ यांना पंधरा दिवसापुर्वी गावात असताना अचानक हृदयविकाराचा तिव्र झटका आल्याने तात्काळ त्यांना निलंगा येथे डॉ. श्रीधर अहंकारी यांच्या हॉस्पीटलला आणण्यात आले. हॉस्पीटलला येण्याआधीच त्यांचा श्वासोच्छ्वास बंद पडला होता. गाडीतून बाहेर काढून त्याच ठिकाणी डॉ. अहंकारी व त्यांच्या टीमने कसोशीने प्रयत्न करत सीपीआर देत पुन्हा त्यांचे हृदय पुर्ववत करुन



त्यांना जिवदान देण्याचे काम केले. डॉक्टर हे देवाचा अवतार आहेत आम्ही आपल्या रुपाने देवच पाहीला अशी भावना व्यक्त करत शेडोळ ग्रामस्थांच्या वतीने गुरुवार (दि ४) रोजी डॉ. अहंकारी, केशव बेंबडे, सुनील जाधव यांचा सत्कार करुन कृतज्ञता व्यक्त केली.

प्रमाण झोप घेणे आवश्यक आहे. याप्रसंगी माजी जि.प. सदस्य व्यंकटराव धुमाळ, सिंदीजवळग्याचे सरपंच अंगद सूरवसे, काटेजवळग्याचे सरपंच शरद सोमवंशी, योगेश साळुंके, साहेबराव हारणे, ऋतविक पवार, शंकर पेठकर, संतोष माळी, गणेश तुगावे, अजित माने, नारायण भारती, सागर नाईक, अश्विनी कांबळे, वैशाली कांबळे, चेअरमन नागनाथ मगर, अंकुश शेळके, प्रताप धुमाळ, किशोर धुमाळ आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# आलमला महाविद्यालयातील गुणवंतांचा सत्कार

## फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी आरोग्य सेवा हीच ईश्वरसेवा समजुन कार्य करावे : डॉ. विवेक सौताडेकर

**औसा/प्रतिनिधी :** तालुक्यातील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी व दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेज आलमला येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने आयोजित करण्यात आलेल्या शैक्षणिक क्रिडा स्पर्धा, संशोधन स्पर्धा परीक्षा व सांस्कृतीक कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुणे डॉ. विवेक सौताडेकर,जिल्हा समन्वयक,समग्र शिक्षा, शिक्षण विभाग,जिल्हा परिषद, लातूर व संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये सत्कार समारंभ संपन्न झाला.

सदरील सत्कार सोहळ्यास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, डॉ. कैलास कापसे, प्रा. दिनेश गुजराथी, विभाग प्रमुख डॉ. समीर शफी इत्यादी मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ विश्वेश्वर धाराशिवे यांनी फार्मसीचे विद्यार्थी रुग्णांची आरोग्य सेवा हीच ईश्वरसेवा समजून कार्य करीत आहेत हे पाहुन आनंद होत आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात त्यांच्या पालकांचा मौलाचा वाटा असतो याची जाणीव विद्यार्थ्यांनी ठेवावी असे सांगून विद्यार्थ्यांचा ना शुभेच्छा दिल्या.प्रमुख पाहुणे डॉ. विवेक सौताडेकर




यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी स्वप्न पाहताना मोठी पहावी आणि ते प्राप्त करण्यासाठी अहोरात्र अभ्यास करावा व फार्मसी शिक्षणाचा उपयोग समाजसेवेसाठी करावे. आजच्या स्पर्धेच्या युगात संधी सहाजासहज प्राप्त होत नाही ती प्राप्त करण्यासाठी सतत ध्यास घेतला पाहिजे परीस्थितीशी लढा देऊन शिक्षण घेऊन यशस्वी व्हावे आणि यशस्वी होण्यासाठी गरीबी कधीही अडथळा होऊ शकत नसल्याचे सांगून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले.

सदरील सत्कार सोहळयात जीपॅट व नाईपर सारख्या स्पर्धा परीक्षेत मानांकन प्राप्त विद्यार्थी विशाल सुर्यवंशी, सौरव सिंग, बागवान मुस्कान, जाधव वैष्णवी, तपासे दिव्या या विद्यार्थ्यांना रोख रक्कम पाच हजार व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

शेख सुरज चाँदपाशा, पाटील चैतन्या पाडूंरंग, दिक्षीत खुशी सतिशसिंग, जाधव सागर प्रमोद, चामवाड तनुजा बालाजी, जाधव राधा वशिष्ठ, कदम निकीता सहदेव, गौंड परीजा संगमेश्वर, पठाण सोफिया मुख्तार, शेख मुस्कान सुल्तान, पठाण अतिका लतिफ, धानुरे भक्ती बसवराज, व्यास उन्नती दिनेश, सौरव सिंग, टेकुळे मुक्ता भरत, पटमास अश्विनी रामेश्वर, आलमले वैष्णवी उन्केश्वर, शेख मंसलवा अब्दुलसाजीद, शेख मसीरा रफिक, चव्हाण सानिका अक्कुर, चालक अनुजा चंद्रकांत, कोठारी निशा महेंद्र, बाजपायी रीतु संतोष, वाघमारे गायत्री प्रदीपकुमार, गबाळे वैभव नारायण, चौरडिया दिव्या रमेश, कदम आकांक्षा श्रीरंग, काबरा विनय श्रीराम, जाधव आकांक्षा बाळासाहेब, बोडके पृथ्वी रवि, चामे गजाजन बाबुराव, पटेल फिजा सालार, भेंडे सुशांत संजय,फिरदोस कुरेशी इत्यादी बी. फार्मसी, फार्म. डी, एम. फार्मसी व डी. फार्मसीच्या अभ्यासक्रमाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.


## मध्य रेल्वे

सोलापूर विभाग

पी.वे मटेरियल आणि फिटिंग्जची वाहतूक

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) यांनी खालील कामांसाठी नामांकित कंत्राटदार कंपनीकडून ई-निविदा मागवल्या आहेत. **निविदा सूचना क्रमांक:** २४-२०२५-SrDENS, **तारीख:** ०३.०९.२०२५. **कामाचे नाव:** इतर विभागातून पी.वे मटेरियल आणि फिटिंग्जची वाहतूक, स्लीपर कारखान्यांमधून सोलापूर विभागात आणि सोलापूर विभागात एसएसई/पी.वे/स्टोअर सोलापूर अंतर्गत दोन वर्षांसाठी विविध प्रकारच्या स्लीपरची वाहतूक. **कामाची अंदाजे किंमत:** रु. ६,३५,७७,२६३.८१. **बयाणा रक्कम:** रु. ४,६७,९००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** २४ महिने. देखभाल कालावधी: एनए . www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: २५.०९.२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ : २५.०९.२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल: www.ireps.gov.in

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम),
मध्य रेल्वे, सोलापूर

DE/Sur-61

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

## श्री जय जगदंबा नवरात्र महोत्सव मंडळ

जगदंबा मार्केट, गोलाई, लातूर

### ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

श्री जय जगदंबा नवरात्र महोत्सव मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा मंडळाचे अध्यक्ष श्री शिवशंकरप्पा बिडवे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि. ०८/०९/२०२५ रोजी रात्री ठिक ७ वाजता गोलाई येथील जगदंबा मंदिराच्या पहिल्या मजल्यावर घेण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहुन सहकार्य करावे, ही विनंती.

**नोटः कोरम अभावी ही सभा तहकूब झाल्यास हि सभा त्या ठिकाणी त्याच दिवशी अर्धा तास उशिराने घेण्यात येईल.**

दिनांक : ०८/०९/२०२५   वेळ : रात्री ७.०० वाजता

स्थळ : श्री जय जगदंबा मंदिर गोलाई, लातूर

स्वाक्षरीत/-
बसवंत ब. भरडे
सचिव
श्री जय जगदंबा नवरात्र महोत्सव मंडळ, लातूर

## छोटी जाहीरात उत्तम प्रतिसाद

व्हि. पी. वर्मा ज्वेलर्स
सोने व चांदीच्या तयार दागिन्यांचे व्यापारी
मेन रोड, सराफ लाईन, लातूर
8421217321
9028370870

Visa Guidance
* Saudi Arabia
* Kuwait
* Oman (Muscat)
* Qatar (Doha)
* UAE (Dubai)
* Air Ticket
ZAKI SAWKAR & CO.
9423045966 - 9657173693 - 7385816592
K.K. Pan Shop, Opp. Hero Motor Showroom, Barshi Road, Latur.
Ph: 02382-259966 :Email : zakisawkar@gmail.com

AM CSC Digital Colour Xerox
सर्व कार्यालयांचे आयकार्ड,एक्रेलिक कार्ड,डिझायनिंग,पत्रिका, व्हीजिटींग कार्ड,लेटरहेड,बिल बुक,झेरॉक्स,कलर झेरॉक्स/प्रिंट, 12x18 प्रिंट,लॅमिनेशन,स्पायरल बाईडींग,टायपिंगची, D.T.P.
पत्ता:महात्मा बसवेश्वर महाविलया जवळ, श्री महात्मा बसवेश्वर पुतळ्याच्या मागे,पेट्रोल पंप रोड,आर.के. पान स्टॉल जवळ, लातूर मो. नं. : 9503283416

Kirankumar Chandak
9421370555
Nita Electricals
All types of electrical goods suppliers
Email : nitaelectricals@gmail.com
Kamdar Road, Hanuman Chowk, Latur - 413512
(M.S.) Ph. 02382-257290


### वाचकांसाठी सूचना

दै. सारथी समाचार वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुरांची शहनिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै. सारथी समाचार वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्याची पुर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै. सारथी समाचारचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

हे पत्रक मुद्रक, मालक, प्रकाशक : संगम प्रभाकरराव कोटलवार यांनी सारथी प्रेस, १२ नं. रेल्वे स्टेशन, बार्शी रोड, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून ११, म्युनिसिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, मेन रोड, लातूर, जि. लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक : संगम कोटलवार (पीआरबी कायद्यानुसार) www. sarathisamachar.com, email.sarathisamachar786@gmail.com RNI NO. MAHMAR / 2011 / 42771. फोन : मोबा. ९८९०७६२६२४ (सर्व वाद लातूर न्याय कक्षेत.)